विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी अमरावती ची स्थापना.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय, क्रमांक - ओआरएम-१०९६/प्र.क्र. ३३/९६/१२-अ.
दिनांक - ७ डिसेंबर १९९६

शासन निर्णय :- जबाबदार व लोकाभिमुख प्रशासन निर्माण करण्यासाठी तसेच प्रशासनातील कार्यक्षमता वाढविण्याच्यादृष्टीने वर्ग १ च्या अधिका-यांना ज्याप्रमाणे यशदा, पुणे येथे प्रशिक्षण दिले जाते, त्याच धर्तीवर वर्ग २ व वर्ग ३ च्या अधिका-यांसाठीही नियत कालावधीने प्रशिक्षण देण्यासाठी महाराष्ट्रात इतर ठिकाणीही प्रशिक्षण संस्था असावी असा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. अशी संस्था स्थापनेमागे अधिका-यांना व कर्मचा-यांना कार्य विषयक प्रशिक्षण [ऑन जॉब ट्रेनिंग] तसेच व्यवस्थापक प्रशिक्षण [मॅनेजमेंट ट्रेनिंग] ही उद्दीष्टे समोर ठेवण्यात आली होती. सर्व बाबींचा विचार करुन व त्यासाठी विभागीय आयुक्त अमरावती यांनी सादर केलेला अहवाल व शिफारशी लक्षात घेऊन शासनाने यशदा, पुणे या प्रशिक्षण संस्थेच्या धर्तीवर अमरावती येथे विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी या नावाने एक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यास अनुसरुन शासन खालील प्रमाणे कार्यवाही आदेशित करित आहे.

१] अमरावती येथील आरतीया प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीमध्ये सुरुवातीला प्रशिक्षण संस्था सुरु करण्यात यावी व त्याचबरोबर संस्थेसाठी अमरावती येथे नवीन इमारत बांधून संस्था नंतर नवीन इमारतीमध्ये हलविण्यात यावी.

२] विदर्भ प्रशासकीय विकास प्रशिक्षण प्रबोधिनी या संस्थेचे ध्येय व उद्दिष्टे पुढील प्रमाणे असतील.

[१] जबाबदार व लोकाभिमुख प्रशासनाचा अंतिम उद्देश साध्य करण्यासाठी कार्य-प्रणालीमध्ये सुधारणा घडवून आणणे.

[२] कर्मचारी व अधिकारी यांचे ज्ञान व कौशल्य व्यक्तिगत व सांघिक पातळीवर वाढविणे.

[३] अधिकारी व कर्मचारी यांची वैचारिक व कार्य करण्याच्या प्रणालीमध्ये बदल घडवून आणणे.

... २ ...

२. संस्थेमध्ये मुख्यत्वेकरुन : विदर्भातील वर्ग २ व वर्ग ३ च्या अधिकारी कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले जावे.

३. विदर्भातील प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनीच्या कामावर सामान्य प्रशासन विभागाचे प्रशासनिक नियंत्रण रहावे. सदर संस्थेची प्रशिक्षण विषयक धोरणे व कार्यक्रम ठरविण्यासाठी प्रधान सचिव [सेवा] सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एक नियामक मंडळ असावे व नियामक मंडळावर १४ सदस्य खालील प्रमाणे असावेत.

१] प्रधान सचिव [सेवा], सामान्य प्रशासन विभाग,
[पदसिध्द अध्यक्ष]

२] विभागीय आयुक्त, अमरावती [पदसिध्द उपाध्यक्ष]

३] विभागीय आयुक्त नागपूर [पदसिध्द उपाध्यक्ष]

४] सचिव, महसूल व वन विभाग किंवा त्यांचे प्रतिनिधी [पदसिध्द]

५] सचिव, ग्रामीण विकास विभाग किंवा त्यांचे प्रतिनीधी [पदसिध्द]

६] मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, अमरावती.

७] मुख्य अभियंता पाटबंधारे विभाग , नागपूर

८] विदर्भ वैधानिक विकास मंडळाच्या अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेल्या मंडळावरील प्रतिनिधी.

९] यशदाचे, प्रतिनिधी

१०] महाराष्ट्र शासनातर्फे नामनिर्देशित करण्यात येणारी एक व्यक्ती ती खालीलपैकी कुठल्याही एक किंवा अधिक क्षेत्रात भरीव काम करणारी असावी.

"कृषि व ग्राम विकास" [वने, मत्स्य आणि पशुसंवर्धन यांचा अंतर्भाव] व्यवसाय व उद्योग, वाणिज्य व व्यापार, बँकींग आणि विमा, सार्वजनिक वापर जसे- परिवहन, उर्जा आणि संपर्क, सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे, समाजकल्याण, पर्यटन, लोक संपर्क, नियामित सेवा, जसे – महसूल, न्यायिक, पोलिस, आयकर, विक्रीकर आणि नागरी पुरवठा, नगरपालिका संस्था, नगर पध्दती, पर्यावरण आणि वनीकरण."

११] महाराष्ट्र सरकारने नेमावयाची व्यवस्थापनातील एक नामांकित व्यक्ती,

१२] संचालक, वाल्मी

१३] अध्यक्षांनी संस्थेच्या प्रशिक्षकांमधून नेमावयाची एक व्यक्ती

१४] संस्थेचे संचालक [पदसिध्द] सदस्य सचिव

तर दैनंदिन कामावरील नियंत्रणासाठी एक कार्यकारी समिती असावी.

कार्यकारी समितीचे अमरावती विभागाचे विभागीय आयुक्त हे अध्यक्ष असावेत. व एकूण सदस्य पुढिलप्रमाणे असावेत

१] विभागीय आयुक्त, अमरावती [पदसिध्द अध्यक्ष]
२] संचालक [पदसिध्द उपाध्यक्ष]
३] उप/सह सचिव [प्रशिक्षण] सामान्य प्रशासन विभाग [पदसिध्द]
४] विभागीय आयुक्त नागपूर यांनी नेमलेल्या नागपूर विभागातील एक जिल्हाधिकारी.
५] मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, अमरावती.
६] विदर्भ विभागातील एक मुख्य कार्यकारी अधिकारी [जिल्हा परिषद] [नियामक मंडळाच्या अध्यक्षांनी नामनिर्देशीत केलेले]
७] प्रबंधक किंवा तत्सम प्रशासकीय अधिकारी [पदसिध्द] सदस्य सचिव

नियामक मंडळाची वर्षातून किमान एकदाही बैठक व्हावी, ज्यावेळी संस्थेचे धोरण विषयक बाबीवर निर्णय घेण्यात येईल, तर कार्यकारी समितीची सभा आवश्यक असेल त्या-त्यावेळी वर्षातून किमान २ वेळा घेण्यात येतील.

४. विदर्भ प्रशासकिय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी संस्था "यशदा" पुणे संस्थेप्रमाणेच सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट अंतर्गत नोंदणीकृत स्वायत्त संस्था असेल व संस्थेसाठीच्या खर्चासाठी शासनातर्फे १०० % अनुदान दिले जाईल.

संस्थेची नोंदणी करण्याचे काम त्वरेने करण्याच्या दृष्टीने तसेच खर्चाबाबतचे सविस्तर प्रस्ताव तयार करणे व इतर आवश्यक प्रारंभिक बाबी यासाठी खालील प्रमाणे पदे निर्माण करण्यात येत आहेत.

अ. क्र.	पदनाम	पदसंख्या	वेतनश्रेणी
१.	विशेष कार्य अधिकारी	१	३२००-४०००
२.	लघुलेखक [उच्चश्रेणी]	१	२०००-३२००
३.	वरिष्ठ लिपीक	१	१२००-२०४०
४.	लिपीक-टंकलेखक	१	९५०-१५००
५.	शिपाई	१	७५०-९४०
	एकूण	५	

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

[के.सी. श्रीवास्तव]
प्रधान सचिव [सेवा]

प्रति,
१. मा. राज्यपालांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
३. मुख्य सचिव (क्रु मा प)
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
~~विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.~~

४. सचिव, महसूल व वन विभाग,
५. सचिव, ग्रामीण विकास विभाग,
६. अध्यक्ष मराठवाडा वैधानिक विकास मंडळ,
७. सदस्य सचिव, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ,
८. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
९. महासंचालक, यशदा पुणे,
१० प्राचार्य वाल्मी संस्था, औरंगाबाद,
११ जिल्हाधिकारी, औरंगाबाद,
१२ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड,
१३ मुख्य अभियंता पाटबंधारे, पाटबंधारे विभाग,
१४ सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन क्रमांक १२